# मुंबई मेट्रो उभारणार १२५० खाटांचा कक्ष

सकाळ वृत्तसेवा

मुंबई, ता. २६ : मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे (एमएमआरसीएल) दोन कोव्हिड कक्षाची उभारणी करण्यात येत आहे. यापैकी एक दहीसर चेक नाका परिसरात ८०० खाटांचे अलगीकरण कक्ष उभारण्यात येणार असून २०० ऑक्सिजनिटेड खाटादेखील उपलब्ध असणार आहेत; तर दुसरे कंदर पाडा, बोरिवली आरटीओजवळ २५० खाटांसह डायलिसिस केंद्र सुविधा असणार आहे.

कोरोनाच्या वाढत्या रुग्णांच्या पार्श्वभूमीवर बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्समध्ये (बीकेसी) एमएमआरडीएने १००८ खाटांचे रुग्णालय उभारल्यानंतर त्याच्याच शेजारी ९५० खाटांचे अत्याधुनिक रुग्णालय उभारण्याचे काम वेगाने सुरू आहे. रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेऊन एमएमआरसीएलने दोन कोव्हिड कक्ष उभारण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये १२५० खाटांमध्ये अलगीकरण कक्ष आणि डायलिसिस केंद्रचा समावेश असणार आहे.